# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण२०२०/प्र.क्र.६४/२०२०/कोषाप्रशा५
वित्त विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ मे, २०२०.

प्रति,

अधिदान व लेखा अधिकारी,
सर्व कोषागार/उपकोषागार अधिकारी,

विषय : सार्वजनिक आरोग्य विभाग/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांची वेतन देयके ०१ अंतर्गत पारित करण्याबाबत..

संदर्भ : १)वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२२/ कोषाप्रशा ४,दि. २९ जानेवारी, २०२०.
२)शासन परिपत्रक समक्रमांक दि. १६ एप्रिल, २०२०

उपरोक्त क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये कंत्राटी सेवेतील कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक/ मानधन १०-कंत्राटी सेवा या उद्दिष्ट शीर्षातर्गत आहरीत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत आवश्यक ती तरतूद आर्थिक वर्ष २०-२१ च्या अंदाजपत्रकात करण्याबाबत देखील विभागांना कळविण्यात आले होते. तथापि, अनेक विभागांकडे १०-कंत्राटी सेवा या उद्दिष्ट शीर्षातर्गत पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद नसल्याने उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ च्या परिपत्रकान्वये १३ - कार्यालयीन खर्च या शीर्षातर्गत तरतूद पुनर्वाटपाद्वारे १०- कंत्राटी सेवा या उद्दिष्टशिर्षातंर्गत वापरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, १३ -कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षातर्गत देखील पुरेशी तरतूद नसल्याने आरोग्य सेवेशी निगडीत कर्मचाऱ्यांची मानधन / पारिश्रमिक देयके ०१ या तपशीलवार शिर्षातर्गत सादर करण्यात येत असल्याची बाब काही कोषागारांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

कोवीड १९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी आपत्कालीन परिस्थितीमध्ये काम करत आहेत. त्यांच्या वेतनाची गैरसोय होऊ नये याद्दष्टीने

...२/-

Scanned with CamScanner

कोषागारांनी जून, २०२० पर्यंत अशी वेतन देयके पारित करावीत. सदर सूचना सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याद्वारे सादर करण्यात येणाऱ्या देयकांपुरतीच मर्यादित राहील.

(नितीन गद्रे)
प्रधान सचिव (ले व को),महाराष्ट्र शासन

प्रत उचित कार्यवाहीस्तव :

१.प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

२.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, विधान मंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांच्या मानधनाकरीता आवश्यक ती तरतूद १०-कंत्राटी सेवा या शीर्षांतर्गत करुन घ्यावी. जुलै,२०२० पासूनची मानधनाची देयके १०-कंत्राटी सेवा या उद्दिष्ट शीर्षांतर्गत असल्याखेरीज पारित करण्यात येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीस्तव : संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

Scanned with CamScanner